ePaper

**रशिया देणार पाकिस्तानला 'संजीवनी'?; पुतिन यांच्या प्लॅननं भारताला मोठा धक्का**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज(TM)

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 04 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

दगडफेक महागात; ३६ जण जाळ्यात

## 21 जणांचा जागीच मृत्यू ; तांत्रिक बिघाडाची शक्यता

# पाकिस्तानचे लष्करी हेलिकॉप्टर कोसळले..!

महाईन्यूज I नवी दिल्ली

**पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या काश्मीरमध्ये (POK) पाकिस्तानी लष्कराचे 'एमआय-17' (MI-17) हेलिकॉप्टर कोसळले. यात सर्व लष्करी कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. हेलिकॉप्टरमध्ये किती लोक होते, याची माहिती लष्करानं तात्काळ जाहीर केली नाही. आंदोलकांनी ते पाडले की अन्य कारणांमुळे ते कोसळले, याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. ही घटना पाकिस्तानव्याप्त काश्मीरची राजधानी मुझफ्फराबादजवळ घडली.**



पाकिस्तानच्या सशस्त्र दलांची अधिकृत प्रसारमाध्यम आणि जनसंपर्क शाखा असलेल्या 'इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स'नं (ISPR) हेलिकॉप्टरच्या घटनेला दुजोरा दिला आहे. काश्मीरमधील (POK) मुझफ्फराबाद शहरात उड्डाण करताना तांत्रिक बिघाडामुळे पाकिस्तान लष्कराच्या एव्हिएशन विंगचे 'एमआय-17 ' (MI-17) हेलिकॉप्टर अचानक कोसळले. या अपघातात हेलिकॉप्टरमधील सर्व कर्मचाऱ्यांचा (अधिकारी आणि जवान) मृत्यू झाला. बचाव आणि शोध पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत. अपघाताचे नेमके तांत्रिक कारण शोधण्यासाठी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत, असे पाकिस्तानमधील माध्यमानं म्हटलं आहे.



ऑगस्टमध्ये, खैबर-पख्तुनख्वा सरकारच्या हेलिकॉप्टरचा आदिवासी जिल्ह्यात अपघात होऊन पाच कर्मचारी मृत्युमुखी पडले होते. हे हेलिकॉप्टर पूरग्रस्तांसाठी मदत साहित्य घेऊन जात होते. याआधी 2022 मध्ये, बलुचिस्तानमध्ये बेपत्ता झालेल्या पाकिस्तान लष्कराच्या हेलिकॉप्टरचे अवशेष लासबेला जिल्ह्यात सापडले होते. ISPR ने जारी केलेल्या निवेदनानुसार, हेलिकॉप्टरमधील सर्व सहा अधिकारी आणि जवान या अपघातात मृत्युमुखी पडले होते.

### लष्कराकडून उच्चस्तरीय चौकशीचे आदेश...

दरम्यान, या भीषण अपघाताच्या कारणांचा शोध घेण्यासाठी पाकिस्तान लष्कराने उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली आहे. प्राथमिक तपासात तांत्रिक बिघाड हेच अपघाताचे मुख्य कारण असल्याचे सांगितले जात असले, तरी घातपातासह सर्व बाजूंनी या प्रकरणाचा तपास केला जाणार आहे. या दुर्घटनेमुळे पाकिस्तान लष्करामध्ये मोठी खळबळ उडाली असून, अपघाताचा सविस्तर अहवाल लवकरच समोर येण्याची शक्यता आहे.

### उड्डाण घेतानाच तांत्रिक बिघाड

प्राथमिक माहितीनुसार, हे हेलिकॉप्टर पाकव्याप्त काश्मीरमधील 'नीलम व्हॅली' भागात अतिरिक्त जवानांना घेऊन जात होते. मुझफ्फराबादजवळ उड्डाण घेत असतानाच अचानक हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. वैमानिकाने परिस्थिती नियंत्रणात आणत आपत्कालीन लँडिंग करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यात यश आले नाही आणि हेलिकॉप्टर कोसळले.

### घटनास्थळी मदतकार्य सुरू

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि लष्कराच्या बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली. लष्कराने संपूर्ण परिसराला वेढा घातला असून ढिगारा हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हेलिकॉप्टरमधील सर्व २१ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, अद्याप मृत जवानांची नावे अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नाहीत.



# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोला नवा मुहूर्त

## १५ जुलैपासून पहिला टप्पा सुरू, डिसेंबरअखेर संपूर्ण मार्गिका कार्यान्वित

**महाईन्यूज । पुणे**

**नेकदा मुदतवाढीमुळे चर्चेत राहिलेल्या हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाला अखेर नवा मुहूर्त मिळाला असून पहिल्या टप्प्यातील मेट्रो सेवा १५ जुलैपर्यंत सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कला पुण्याच्या मध्यवर्ती भागाशी जोडणाऱ्या या महत्त्वाकांक्षी मार्गिकेवर सुरुवातीला माण ते रामनगर (बाणेर) दरम्यानच्या १२ स्थानकांवर मेट्रो धावणार आहे. तर डिसेंबर २०२६ अखेर संपूर्ण २३ किलोमीटर लांबीची मार्गिका प्रवाशांसाठी खुली होणार असल्याची माहिती पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी यांनी दिली.**



हिंजवडी ते शिवाजीनगर ही पुण्यातील तिसरी मेट्रो मार्गिका असून हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारीत पीएमआरडीएकडून पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. मात्र, विविध तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे या प्रकल्पाच्या उद्घाटनाचे आतापर्यंत तब्बल आठ मुहूर्त हुकले आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी होती. आता प्रकल्पाच्या कामाला गती देत कंपनीला ३० जूनपर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे.

पावसाळ्यामुळे काही तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पहिल्या टप्प्यात १२ स्थानकांपर्यंत सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून १५ ते २० जूनदरम्यान तपासणी होणार असून त्यानंतर आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतर सेवा सुरू होईल. पहिल्या टप्प्यानंतर उर्वरित स्थानकांची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार असून डिसेंबरअखेर संपूर्ण मार्गावर मेट्रो धावण्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

दरम्यान, मेट्रो प्रकल्पासह पीएमआरडीए हद्दीतील विविध विकासकामांनाही गती देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वर्ग झालेल्या सुमारे दोन हजार एकर शासकीय व गायरान जमिनींचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणातून अतिक्रमणांची माहिती संकलित करून त्यावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे चौधरी यांनी स्पष्ट केले.

तसेच पीएमआरडीए हद्दीतील अनधिकृत होर्डिंगविरोधातही मोठी मोहीम राबविण्यात येणार आहे.

हद्द विस्तीर्ण असल्याने कारवाईसाठी स्वतंत्र संस्थांचे पॅनेल तयार करण्यात येणार असून तालुकानिहाय जबाबदारी देण्यात येईल. नियमितीकरण न केलेल्या होर्डिंगधारकांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

### आठ मुहूर्त हुकल्यानंतर अखेर मार्ग मोकळा

वाघोलीतील नगररोड ते आय.व्ही. इस्टेट दरम्यानचा हा मार्ग सध्या एका 'मिसिंग लिंक'सारखा आहे. हा १८ मीटरचा रस्ता पूर्ण झाल्यास नगररोडवरून थेट अंतर्गत भागात जाणे सोपे होईल. सध्या वाघोलीत वाढत्या शहरीकरणामुळे वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. केसनंद रोड आणि नगररोडवरील वाहतूक विभागली गेल्यामुळे मुख्य चौकांमधील कोंडी कमी होण्यास मदत होईल. उपलब्ध १.५० कोटी रुपयांच्या निधीच्या जोरावर एकूण ९.६७ कोटी रुपयांच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला आहे. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर आता हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मुख्य सभेकडे धाडण्यात आला आहे. एकदा का प्रशासकीय आणि वित्तीय सोपस्कार पूर्ण झाले की, या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होईल.

---

## महापौर कार्यालय, विधान भवनाला बॉम्बची धमकी; पुणे पोलिसांची धावपळ

**महाईन्यूज । पुणे**

**महापौर कार्यालय, विधान भवन (कौन्सिल हॉल) आणि शनिवार पेठेतील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोतीबाग कार्यालयात बॉम्ब ठेवल्याचा धमकीचा ई-मेल बुधवारी सकाळी प्राप्त झाल्याने पुण्यात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पुणे पोलिसांनी तातडीने हालचाल करत बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या (बीडीडीएस) मदतीने संबंधित परिसरांची सखोल तपासणी केली. मात्र, तपासादरम्यान कोणतीही संशयास्पद किंवा बॉम्बसदृश वस्तू आढळून आली नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.**



मिळालेल्या माहितीनुसार, महापौर मंजुषा नागपुरे यांच्या कार्यालयात बुधवारी सकाळी सुमारे सव्वादहा वाजता धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. या ई-मेलमध्ये महापौर कार्यालयासह विधान भवन आणि मोतीबाग येथे बॉम्ब ठेवल्याचा उल्लेख करण्यात आला होता. त्यानंतर प्रशासन आणि पोलिस यंत्रणा तात्काळ सतर्क झाली.

शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. बॉम्ब शोधक पथकातील प्रशिक्षित श्वान आणि तज्ज्ञ कर्मचाऱ्यांनी महापौर कार्यालयासह संपूर्ण परिसराची बारकाईने तपासणी केली. सुरक्षेच्या कारणास्तव या काळात महापालिकेत येणाऱ्या नागरिकांच्या प्रवेशावर तात्पुरती निर्बंध घालण्यात आले होते.

दुपारी सव्वाएक वाजेपर्यंत महापौर कार्यालय आणि परिसराची तपासणी सुरू होती. त्याचबरोबर मोतीबाग कार्यालय आणि विधान भवन परिसरातही शोधमोहीम राबविण्यात आली. सर्व ठिकाणांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर कुठेही बॉम्ब किंवा संशयास्पद वस्तू आढळून न आल्याने प्रशासनाने सुटकेचा निश्वास सोडला.

प्राथमिक तपासात हा ई-मेल खोडसाळपणे पाठविण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. धमकीचा ई-मेल पाठविणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला असून, संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

### तपासणीनंतर अफवा ठरली धमकी

महापौर कार्यालय, विधान भवन आणि मोतीबाग येथे बॉम्ब ठेवल्याचा दावा करणाऱ्या ई-मेलनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत सर्व ठिकाणी सखोल तपासणी केली. मात्र कोणतीही बॉम्बसदृश वस्तू न आढळल्याने हा प्रकार खोडसाळपणाचा असल्याचा प्राथमिक निष्कर्ष समोर आला आहे. सायबर पोलिसांकडून ई-मेलचा उगम शोधण्याचे काम सुरू आहे.

# दगडफेक महागात; ३६ जण जाळ्यात

## सीसीटीव्ही व ड्रोन फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध; आणखी अटकांची शक्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिखली-कुदळवाडी परिसरातील अनधिकृत धार्मिक स्थळांवरील निष्कासन कारवाईदरम्यान पोलिसांवर झालेल्या दगडफेक प्रकरणात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी मोठी कारवाई करत आतापर्यंत ३३ आरोपींना अटक केली असून ३ विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले आहे. त्यामुळे या प्रकरणातील एकूण कारवाईची संख्या ३६ वर पोहोचली आहे. दरम्यान, घटनेत ३०० ते ५०० अनोळखी व्यक्ती सहभागी असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून त्यांच्या शोधासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून कुदळवाडी परिसरातील अनधिकृत धार्मिक बांधकामांवर कारवाई सुरू असताना मोठा जमाव घटनास्थळी जमा झाला होता. यावेळी काही समाजकंटकांनी पोलिस व शासकीय कर्मचाऱ्यांवर दगडफेक केल्याचा आरोप आहे. या घटनेत शासकीय कामात अडथळा निर्माण होण्याबरोबरच सरकारी मालमत्तेचे नुकसानही झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

घटनेनंतर चिखली पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींच्या अटकेची मोहीम हाती घेतली. तपासासाठी सीसीटीव्ही कॅमेरे, ड्रोनद्वारे चित्रीत दृश्ये तसेच पोलिसांच्या शासकीय कॅमेऱ्यांमधील फुटेजची बारकाईने तपासणी केली जात आहे. उपलब्ध व्हिडिओंच्या आधारे संशयितांची ओळख पटवून त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांनी सांगितले की, पोलिसांवर हल्ला करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला कायद्याच्या कक्षेबाहेर राहू दिले जाणार नाही. प्रत्येक आरोपीची अचूक ओळख पटवून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या प्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३८४/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध गंभीर कलमांसह महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम आणि अन्य कायद्यांअंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सहायक पोलीस निरीक्षक राम गोमारे यांच्या फिर्यादीनुसार, ९ जून रोजी मध्यरात्री किंग वजन काट्यासमोर, नायरा पेट्रोल पंपाजवळील सार्वजनिक रस्त्यावर ही घटना घडली. अटक आरोपींकडून सखोल चौकशी करून फरार आरोपी, त्यांच्या साथीदारांची माहिती, दंगलीत वापरलेली वाहने व संभाव्य शस्त्रांचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, आरोपींना पोलीस कोठडी देण्याची मागणी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पिंपरी न्यायालयात करण्यात आली असून या प्रकरणाचा पुढील तपास चिखली पोलीस करीत आहेत.

### अटक आरोपींची यादी

चिखली-कुदळवाडी दगडफेक प्रकरणात आतापर्यंत ३३ आरोपींना अटक करण्यात आली असून ३ विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यामुळे एकूण कारवाईची संख्या ३६ झाली आहे. आरोपींमध्ये नाजीम चौधरी, इजाज चौधरी, मोहम्मद उस्मान इद्रीसी, अब्दूल रहमान इद्रीसी, आजम रज्जाक, मोहम्मद आसीफ इद्रीसी, नसरुद्दीन सिद्दीकी, रफीक शेख, शाहीआलम सिद्दीकी, साहिल शेख, गुलामहुसैन खान, निजाम सिद्दीकी, अब्दूल करीम चौधरी, रामदेव पांडे, फैजन चौधरी, युसुफ चौधरी, अकदस खान, अबु सोफीया चौधरी, नसिम इद्रीसी, मोहम्मदनवाज खान, कयामुध्दीन चौधरी, मोहम्मदकासिम चौधरी, फय्यज खान, मकसूद चौधरी, मेहफुज चौधरी, आकाश सूर्यवंशी, जुनेद बेग, मुराद बेग, आरिफ इद्रीसी, अभिनंदन यादव, इलियास तांबोळी, शादाब मोमीन आणि शादाब सय्यद यांचा समावेश आहे. आणखी संशयितांचा शोध सुरू आहे.

### दगडफेक प्रकरणातील कारवाई

| | |
|---|---|
| अटक आरोपी | – ३३ |
| विधीसंघर्षित बालके | – ३ |
| एकूण कारवाई | – ३६ |
| संशयित अनोळखी व्यक्ती | – ३०० ते ५०० |
| तपासासाठी सीसीटीव्ही, ड्रोन व शासकीय फुटेजची मदत | |
| आणखी अटकांची शक्यता, शोधमोहीम सुरू. | |

# भोसरी-दिघी रस्त्याच्या संथ कामामुळे नागरिक हैराण...

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भोसरी-दिघी रस्त्याचे सुरू असलेले कॉंक्रिटीकरणाचे काम संथ गतीने सुरू असल्याने नागरिक, वाहनचालक आणि व्यापाऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. वाहतूककोंडी, धुळीचे वाढते प्रदूषण, अपुऱ्या सुरक्षा उपाययोजना आणि सूचनाफलकांचा अभाव यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. पावसाळा तोंडावर आला असतानाही काम पूर्ण झाले नसल्याने प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत आहे.**



गंगोत्री पार्क ते राजमाता जिजाऊ उड्डाणपूल या सुमारे १२७० मीटर लांबीच्या मार्गावर कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. हा रस्ता प्रभाग क्रमांक ५ आणि ७ मधून जात असून शहरातील अत्यंत वर्दळीच्या मार्गांपैकी एक मानला जातो. या मार्गावरून दररोज हजारो दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहतूक करणारी वाहने ये-जा करतात. परिसरात शाळा, बाजारपेठा, व्यावसायिक आस्थापने आणि निवासी वसाहती असल्याने नागरिकांची मोठी वर्दळ असते.

रस्त्याच्या कामादरम्यान आवश्यक सूचना फलक, पर्यायी मार्गदर्शक फलक आणि सुरक्षाविषयक उपाययोजनांचा अभाव असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे पादचारी आणि वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी वाहने एकाच मार्गाने वळविण्यात येत असल्याने सकाळी आणि सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत आहे. परिणामी वाहनचालकांमध्ये वादाचे प्रसंगही घडत असल्याचे नागरिक सांगतात. कॉंक्रिटीकरणाच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे. नियमित पाणी फवारणी न केल्याने धुळीचा त्रास अधिक वाढला आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि व्यावसायिकांना याचा फटका बसत असल्याची तक्रार करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी रस्त्यावरील खड्ड्यात एक चारचाकी वाहन अडकल्याची घटना घडली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र अशा घटना प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटी अधोरेखित करतात, असे नागरिकांचे म्हणणे आहे. नागरिकांनी महापालिकेकडे पावसाळ्यापूर्वी रस्त्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करणे, आवश्यक सूचना फलक लावणे, धूळ नियंत्रणासाठी नियमित पाणी फवारणी करणे आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्याची मागणी केली आहे.

### नागरिक त्रस्त

भोसरी-दिघी रस्त्याचे कॉंक्रिटीकरण संथ गतीने सुरू असल्याने वाहतूककोंडी, धुळीचे प्रदूषण आणि अपघातांचा धोका वाढला आहे. सूचना फलकांचा अभाव व अपूर्ण कामामुळे नागरिक त्रस्त असून पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याची मागणी होत आहे.



## भूमिका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सत्ताकालाची बारा वर्षे पूर्ण होत असताना विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीची बैठक पार पडली. गेल्या काही वर्षांत पराभव, फूट आणि नेतृत्वाच्या प्रश्नांनी ग्रासलेल्या विरोधकांसाठी ही बैठक केवळ राजकीय औपचारिकता नव्हती, तर अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न होता.**

# कडा शोधा, विजयाचा मार्ग खुला करा




पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेससमोरील आव्हाने, महाराष्ट्रातील विरोधी पक्षांची झालेली पडझड आणि विविध राज्यांतील अपयश यामुळे विरोधकांवर आत्मपरीक्षणाची वेळ आली आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमतापासून रोखण्यात विरोधकांना काही प्रमाणात यश मिळाले होते. त्यानंतर विरोधक अधिक सक्षम होतील, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात अनेक राज्यांतील विधानसभा निवडणुकांत भाजपने पुन्हा आपली ताकद सिद्ध केली.

याउलट विरोधक आत्मसंतुष्ट राहिले. निवडणुकांपुरते सक्रिय होणारे विरोधी पक्ष आणि वर्षभर संघटनात्मक काम करणारा भाजप यांच्यातील फरक पुन्हा एकदा स्पष्ट झाला. तरीही या बैठकीचे महत्त्व केवळ विरोधकांच्या एकजुटीत नाही. त्याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सत्ताधारी पक्षासमोरील वाढती आव्हाने.

निवडणूक यशाच्या बाबतीत भाजप आजही मजबूत दिसत असला, तरी आर्थिक, परराष्ट्र आणि रोजगाराच्या प्रश्नांवर सरकारकडून अपेक्षित परिणाम दिसत नाहीत. रुपयावरील दबाव, बेरोजगारीची चिंता, बदलते आंतरराष्ट्रीय संबंध आणि विविध स्वायत्त संस्थांबाबत निर्माण होणारे प्रश्न यामुळे सरकारवर अधिक प्रभावीपणे प्रश्न उपस्थित होणे आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये मजबूत विरोधक ही केवळ राजकीय गरज नसून लोकहिताची अट असते. सत्ताधाऱ्यांना जाब विचारणारी आणि पर्यायी विचार मांडणारी शक्ती नसल्यास लोकशाही कमकुवत होते.

त्यामुळे 'इंडिया' आघाडीने एकत्र येण्याचा प्रयत्न केला, ही बाब दखलपात्र ठरते. मात्र केवळ सरकारविरोधी भूमिका घेणे पुरेसे ठरणार नाही. विरोधकांसमोरील खरे आव्हान म्हणजे विश्वासार्ह पर्याय उभा करणे. सरकारच्या चुका दाखविणे सोपे असते; परंतु त्यावर स्वतःकडे अधिक चांगले उत्तर आहे, हे जनतेला पटवून देणे कठीण असते. २०१२-१४ या काळात नरेंद्र मोदी यांनी हेच केले होते.

तत्कालीन केंद्र सरकारवरील नाराजीबरोबरच विकास, प्रशासन आणि नेतृत्वाचा पर्याय म्हणून स्वतःची प्रतिमा त्यांनी उभी केली. त्यामुळे जनतेचा विश्वास त्यांच्याकडे वळला. आज विरोधकांनी त्याच धड्याची आठवण ठेवण्याची गरज आहे. बेरोजगारी, महागाई, शेती, उद्योग, शिक्षण आणि परराष्ट्र धोरण यांसारख्या विषयांवर स्पष्ट कार्यक्रम मांडल्याशिवाय केवळ टीकेच्या आधारावर जनतेचा कौल मिळविणे शक्य होणार नाही. मतदार आता केवळ नाराजी व्यक्त करत नाहीत; ते पर्यायही शोधतात.

लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना अपेक्षित बहुमत न देऊन मतदारांनी बदलाची शक्यता जिवंत असल्याचे दाखवून दिले आहे. त्यामुळे विरोधकांनी निराशा झटकून संघटन, नेतृत्व आणि धोरणात्मक तयारीवर भर देणे आवश्यक आहे. प्रत्येक कठीण किल्ल्याला जिंकण्याचा मार्ग असतो. तो मार्ग शोधण्याचे कौशल्य ज्यांनी विकसित केले, त्यांच्याच हातात भविष्यातील राजकीय संधी येणार आहेत.

## प्रासंगिक »

### मन

**आचार्य विनोबांनी 'देव कसा आहे?' याचे फार सुंदर वर्णन केले आहे. ते म्हणतात, 'देव हा प्रतिष्ठित पाहुण्यासारखा आहे. एखादा पाहुणा दारात उभा राहतो. दारावर टकटक करतो.**

पण यजमानाने दार उघडून 'आत या' म्हटल्याशिवाय घरात शिरत नाही. तसेच देव सर्वत्र आहे. केवळ तुमच्याच दारी आहे, असे नव्हे. जशी सूर्याची किरणे सर्वत्र आहेत. केवळ तुमच्याच दारी आहे, असे नव्हे. जशी सूर्याची किरणे सर्वत्र पसरलेली असतात. पण बंद दारातून आत येऊ शकत नाहीत. मात्र दाराला किंचितही का होईना फट असेल, दार थोडे किलकिले केले असेल तरी प्रकाशाचे दूत त्यातून घरात प्रवेश करतात. तसेच निछापूर्वक संकल्प करून प्रार्थना करणे म्हणजे मनाचे दार किलकिले करणेच आहे. त्या सर्वशक्तीला आव्हान करून बोलवण्यासारखेच आहे. देव, गुरु, प्रेरणादायी स्फूर्तीस्थान ह्यांत एवढी शक्ती असतेच आणि इतरांना ती शक्ती देण्याचा संकल्प असतोच. पण देव अनाहूत पाहुण्यासारखा दारी उभा असतोच. असे स्वरूप विशद करून विनोबांनी प्रार्थनेचे महत्व विशद केले आहे.

- तात्पर्य : ईश्वरी शक्तीचा अनुभव घेण्यासाठी मन खुले ठेवावे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने बारा वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे. या कालखंडाकडे केवळ सत्तेची वर्षे म्हणून पाहता येणार नाही.

# मोदी नेतृत्वाची बारा वर्षे : परिवर्तनाचा प्रवास



विकास, सुशासन, जनकल्याण आणि जागतिक स्तरावर भारताची वाढलेली प्रतिष्ठा यामुळे हा काळ भारतीय राजकारणातील महत्त्वाचा अध्याय ठरला आहे. २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर मोदी सरकारने 'सबका साथ, सबका विकास' हा मंत्र दिला. त्यानंतर 'सबका विश्वास' आणि 'सबका प्रयास' या संकल्पना जोडत विकासाला लोकसहभागाची जोड देण्यात आली. सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये मिळालेला जनादेश हा केवळ राजकीय विजय नसून जनतेने व्यक्त केलेला विश्वास असल्याचे मानले जाते.

या काळात भारताच्या अर्थव्यवस्थेने मोठी झेप घेतली. देश आज जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या उपक्रमांनी उत्पादन व उद्योग क्षेत्राला चालना दिली. मोबाइल उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स आणि संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी उत्पादनात झालेली वाढ भारताच्या आत्मविश्वासाचे प्रतीक मानली जाते. पायाभूत सुविधांच्या विकासातही अभूतपूर्व प्रगती झाली. राष्ट्रीय महामार्गांचे विस्तारित जाळे, वेगवान रेल्वे आधुनिकीकरण, वंदे भारत गाड्या, वाढते मेट्रो नेटवर्क आणि ग्रामीण रस्त्यांची उभारणी यामुळे देशाच्या विकासाला नवी दिशा मिळाली. या सुविधांचा थेट लाभ सामान्य नागरिक, शेतकरी आणि उद्योग क्षेत्राला झाला आहे.

कृषी क्षेत्रात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे कोट्यवधी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. 'लखपती दीदी', सुकन्या समृद्धी योजना आणि स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक बळ देण्याचा प्रयत्न झाला. डिजिटल क्रांतीमुळे शासनाच्या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे शक्य झाले. परराष्ट्र धोरणाच्या आघाडीवर भारताने स्वतंत्र आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका घेतली. जागतिक घडामोडींमध्ये भारताचा प्रभाव वाढला असून अनेक देशांशी संबंध अधिक दृढ झाले आहेत. भारताला आज जबाबदार आणि विश्वासार्ह राष्ट्र म्हणून पाहिले जाते.

सांस्कृतिक क्षेत्रातही अयोध्या राम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, केदारनाथ पुनर्विकास तसेच राष्ट्रीय नेत्यांच्या स्मारकांमुळे सांस्कृतिक अभिमानाला नवी ऊर्जा मिळाली. महाराष्ट्रातील विविध पायाभूत प्रकल्पांनाही केंद्र सरकारचे पाठबळ लाभले. अर्थात, कोणत्याही सरकारसमोर आव्हाने कायम असतात. मात्र गेल्या बारा वर्षांत विकास आणि जनसहभागाच्या माध्यमातून देशाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न झाला, हे नाकारता येणार नाही. विकसित भारत २०४७चे स्वप्न साकार करण्यासाठी या बारा वर्षांची पायाभरणी महत्त्वाची ठरल्याचे समर्थकांचे मत आहे. विश्वास, विकास आणि जनसहभाग यांची ही वाटचाल पुढील काळात कितपत यशस्वी ठरते, याकडे देशाचे लक्ष राहील.

## ।। अभंगवाणी ।।



सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं ।
आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥

जोंवरी या तुम्हां मागिलांची आस ।
तोंवरी उदास होऊं नका ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शाळा लवकर नाहीत; ३० जूनपासूनच घंटा

## शिक्षण संचालनालयाच्या दोन परिपत्रकांना झटका; आरोग्याला प्राधान्य

**महाईन्यूज । नागपूर**

**मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने बुधवारी चिमुकल्या विद्यार्थ्यांचे आरोग्य सर्वात महत्वाचे आहे, असे स्पष्ट करून विदर्भातील राज्य मंडळाच्या सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा येत्या ३० जूनपासून सुरू करण्याचा आदेश दिला. त्यामुळे राज्याच्या शिक्षण संचालनालयाला जोरदार चपराक बसली. असह्य तापमान व दमटपणा कायम असतानाही शिक्षण संचालनालयाने विदर्भातील शाळा आधी १५ जून आणि त्यानंतर २२ जूनपासून सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. हे निर्णय विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणारे होते, असे न्यायालयाच्या आदेशातून स्पष्ट झाले.**



शिक्षण संचालनालयाच्या वादग्रस्त निर्णयांविरोधात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे व जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व राज वाकोडे यांनी विविध बाबी विचारात घेता ती याचिका मंजूर करून शाळा सुरू करण्यासाठी २० एप्रिल २०२३ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा म्हणजे, ३० जूनपासून शाळा सुरू करण्याचा आदेश दिला. या शासन निर्णयाचे विदर्भामध्ये गेल्या शैक्षणिक वर्षापर्यंत पालन केले गेले.

परंतु, यावर्षी शिक्षण संचालनालयाने आधीच्या सर्व निर्णयांकडे दुर्लक्ष करून विदर्भासह राज्यातील सर्व शाळा १५ जूनपासून सुरू करण्याचे परिपत्रक २८ मार्च २०२६ रोजी जारी केले होते. त्यानंतर ही याचिका प्रलंबित असताना ९ जून रोजी नवीन परिपत्रक काढून केवळ विदर्भातील शाळा २२ जूनपासून सुरू होतील, असे जाहीर केले. न्यायालयाने ही दोन्ही परिपत्रके अवैध ठरवून रद्द केली आहेत. याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. भानुदास कुलकर्णी यांनी बाजू मांडली.

### शिक्षण संचालनालयाची कानउघाडणी

शिक्षण संचालनालयाची दोन्ही परिपत्रके न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणारी होती. त्यामुळे न्यायालयाने शिक्षण संचालनालयाची कानउघाडणी करून यानंतर पुन्हा असे वादग्रस्त निर्णय घेतल्यास न्यायालयाच्या अवमानाकरिता दोषी ठरवून कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असा इशारा दिला. न्यायालयाने ८ जून २००७ रोजी समान मुद्यावर निर्णय देताना विदर्भातील शाळा २६ जूननंतर सुरू करण्यास सांगितले होते. हा आदेश सर्वोच्च न्यायालयातही टिकला होता. त्यामुळे या आदेशाचे २०२३ पर्यंत पालन केले जात होते. २०२३ मध्ये ३० जूनपासून शाळा सुरू करण्याचा निर्णय जारी करण्यात आला होता.

# ओव्हरलोडिंगचा फटका; बोट दुर्घटनेत महिला दगावली...

**महाईन्यूज । बीड**

**जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे गोदावरी नदीत ३५ भाविकांना घेऊन जाणारी बोट उलटल्याने एक महिला भाविकाचा मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. बुधवारी घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.**



पुरुषोत्तमपुरी येथे सुरू असलेल्या धार्मिक कार्यक्रमासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. नदी ओलांडण्यासाठी ३५ भाविक एका बोटीत बसले होते. मात्र, बोटीच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी असल्याने नदीच्या मध्यभागी पोहोचताच बोटीचा तोल गेला आणि ती अचानक उलटली. या घटनेनंतर नदीपात्रात एकच गोंधळ उडाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले. स्थानिकांच्या प्रसंगावधानामुळे ३४ भाविकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मात्र, प्रमिला राठोड या महिला भाविकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर सिंधूबाई मावळ (रा. महागाव, जि. वाशीम) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या दुर्घटनेची गंभीर दखल घेत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी उपविभागीय अधिकारी (एसडीओ) स्तरावर चौकशीचे आदेश दिले आहेत. बोटीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी कसे बसवण्यात आले, सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन कुठे झाले आणि यासाठी जबाबदार कोण, याची सखोल चौकशी केली जाणार आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. धार्मिक कार्यक्रमासाठी मोठी गर्दी अपेक्षित असतानाही ही दुर्घटना घडल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नाव चालक आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप होत असून संपूर्ण बीड जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### दुर्घटनेची ठळक माहिती

**गोदावरी नदीत ३५ भाविकांना घेऊन जाणारी बोट उलटली. प्रमिला राठोड यांचा मृत्यू झाला असून सिंधूबाई मावळ या गंभीर जखमी आहेत. स्थानिक नागरिक व पोलिसांच्या मदतीने ३४ भाविकांची सुखरूप सुटका करण्यात आली. घटनेच्या चौकशीचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.**




# पुणे यार्डातील कामामुळे रेल्वे सेवांवर परिणाम

**महाईन्यूज । जळगाव**

पुणे रेल्वे यार्डातील सिग्नलिंग यंत्रणेच्या आधुनिकीकरणासह पायाभूत सुविधांच्या उन्नतीकरणासाठी मध्य रेल्वे प्रशासनाकडून विशेष ट्रॅफिक व पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कामांमुळे भुसावळ मार्गे धावणाऱ्या काही महत्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांच्या परिचालनावर परिणाम होणार असून दोन गाड्या रद्द, तर काही गाड्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.

रेल्वे प्रशासनाकडून पुणे यार्डातील डीडीएस पॉइंट क्रमांक २०८/२०९ बदलण्याबरोबरच सिग्नल आणि पॉइंट व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित, वेगवान आणि कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने हे काम हाती घेण्यात आले आहे. या ब्लॉकमुळे गाडी क्रमांक १२१३५ पुणे–नागपूर एक्स्प्रेस १४ जून रोजी पूर्णपणे रद्द राहणार आहे. तसेच गाडी क्रमांक १२१३६ नागपूर–पुणे एक्स्प्रेस १३ जून रोजी धावणार नाही. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे. याशिवाय गाडी क्रमांक ११०७८ जम्मूतवी–पुणे झेलम एक्स्प्रेस १२ जून रोजी हडपसर येथेच समाप्त होईल. तसेच गाडी क्रमांक ११४०६ अमरावती–पुणे एक्स्प्रेस १३ जून रोजी हडपसरपर्यंतच धावेल. या दोन्ही गाड्यांची हडपसर ते पुणे सेवा रद्द करण्यात आली आहे.

दरम्यान, गाडी क्रमांक २२१७१ पुणे–रानी कमलापती एक्स्प्रेसच्या वेळेतही बदल करण्यात आला आहे. ही गाडी १४ जून रोजी दुपारी ३.१५ वाजण्याऐवजी सायंकाळी ७.५५ वाजता पुण्याहून रवाना होईल. त्यामुळे गाडीला सुमारे ४ तास ४० मिनिटांचा विलंब होणार आहे.

# TMC मध्ये फूट सुरूच?

## ८ जून रोजी टीएमसीच्या २८ लोकसभा खासदारांपैकी २० खासदारांचा एनडीए सरकारला पाठिंबा

महाईन्यूज । नवी दिल्ली

**ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल कॉंग्रेस (TMC) पक्षात अंतर्गत फूट सुरूच आहे. बुधवारी राज्यसभा खासदार सुष्मिता देव यांनी पक्षाचा आणि आपल्या पदाचा राजीनामा दिला. अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला. गेल्या तीन दिवसांत तृणमूल कॉंग्रेसच्या दोन राज्यसभा खासदारांनी पक्ष सोडला आहे.**



यापूर्वी ८ जून रोजी सुखेन्दु शेखर यांनी राज्यसभेचा राजीनामा दिला होता आणि पक्षाला रामराम केला.

टीएमसीचे लोकसभेतील २८ पैकी २० खासदार आणि राज्यसभेचे १३ पैकी दोन खासदार मिळून एकूण २२ खासदार फुटले आहेत. ३ जून रोजी पश्चिम बंगालमधील ८० पैकी ५८ आमदारांनी ऋतब्रता यांच्या नेतृत्वाखाली एक वेगळा गट स्थापन केला आणि त्यांनी ऋतब्रता यांना विरोधी पक्षनेते बनवण्याची शिफारस विधानसभा अध्यक्षांकडे केली. त्यातच ममता यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांनी दिल्लीत राहुल गांधी यांची भेट घेतली. एक दिवसाआधी ममता यांनी सोनिया गांधी यांची भेट घेतली होती.

पक्षातून बाहेर पडल्यावर सुष्मिता देव म्हणाल्या की, मी टीएमसी पक्षाचा राजीनामा दिला आहे. पक्षाने मला राज्यसभेची जागा दिली होती. आता जर मी पक्ष सोडत आहे तर मला राज्यसभेची जागाही सोडावी लागेल. यामागे माझी वैयक्तिक आणि राजकीय कारणे आहेत. आता मी स्वतंत्र आहे. कॉंग्रेस पक्षात असल्यापासून हिमंता बिसवा यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. माझी फक्त एक औपचारिक भेट झाली होती. पुढील काही दिवस मी निवांत आहे. मी आसामला जाणार आहे असं सांगत त्यांनी भाजपा प्रवेशावर सस्पेन्स ठेवला.

दरम्यान, ८ जून रोजी टीएमसीच्या २८ लोकसभा खासदारांपैकी २० खासदारांनी एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. खासदारांच्या स्वाक्षरीचे एक पत्र लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांना पाठवण्यात आले आहे. त्यात एका स्वतंत्र संसदीय ब्लॉकच्या स्वरूपात वेगळ्या आसनव्यवस्थेची मागणीही करण्यात आली आहे असं खासदार आणि टीएमसीच्या माजी नेत्या काकोली घोष दस्तीदार यांनी सांगितले. टीएमसीच्या बंडाची बातमी सर्वप्रथम ३ जून रोजी समोर आली. पक्षातून काढून टाकलेले आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांना नेते बनवण्यासाठी ५८ बंडखोर आमदारांनी विधानसभा अध्यक्ष रतिंद्र बोस यांना पाठिंब्याचे पत्र सादर केले. ऋतब्रता यांना विरोधी पक्षनेते म्हणून घोषित करण्याची मागणी त्यांनी केली. अध्यक्षांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली.

### ममता बॅनर्जी यांच्याकडे किती आमदार-खासदार?

टीएमसीचे लोकसभेत एकूण २८ खासदार होते, त्यापैकी २० खासदार फुटले आहेत. ममता बॅनर्जी यांच्याकडे आता लोकसभेत केवळ आठ खासदार उरले आहेत. राज्यसभेत १३ पैकी दोघांनी राजीनामा दिल्याने त्यांच्याकडे केवळ ११ राज्यसभा खासदार उरले आहेत. विधानसभेत यंदाच्या निवडणुकीत टीएमसीने ८० जागा जिंकल्या, त्यापैकी ५८ आमदारांनी वेगळा गट तयार केले आहे. ममता बॅनर्जी यांच्याकडे आता केवळ २२ आमदार उरले आहेत.

---

# 'त्या' बॉम्बस्फोटांमागे श्रीलंकेचा तत्कालिन 'गुप्तहेर प्रमुखच'!

महाईन्यूज । श्रीलंका

**श्रीलंकेमध्ये २०१९ मधील ईस्टर संडे दहशतवादी हल्ल्याचा कट देशाच्या माजी गुप्तहेर प्रमुखानेच रचला होता. या बॉम्बस्फोटात २७९ जणांचा बळी गेला होता. या बॉम्बस्फोटांशी माजी गुप्तहेर प्रमुखाचा थेट संबंध जोडणारे श्रीलंका सरकारचे हे पहिलेच अधिकृत विधान असल्याने याला महत्त्व प्राप्त झाले आहे.**



### श्रीलंकेच्या इतिहासातील सर्वात भीषण दहशतवादी हल्ला

मंत्री आनंद विजेपाला यांनी सांगितले की, मेजर जनरल तुआन सुरेश साले (Suresh Sallay) यांना या हल्ल्यात "मदत आणि चिथावणी" दिल्याचा आरोपावरून फेब्रुवारीमध्ये अटक करण्यात आली होती. त्यांनीच हल्ल्यासाठी एका कॅथोलिक चर्चची निवड केली होती. नागरिकांवर झालेला श्रीलंकेतील हा आतापर्यंतचा सर्वात भीषण दहशतवादी हल्ला होता. यामध्ये राजधानीतील तीन आलिशान हॉटेल्स, कोलंबोबाहेरील दोन रोमन कॅथोलिक चर्च आणि एका इव्हँजेलिकल प्रोटेस्टंट चर्चला लक्ष्य करण्यात आले होते.

मंत्री विजेपाला म्हणाले, "तपासातून असे समोर आले आहे की, निवृत्त मेजर जनरल तुआन सुरेश साले यांनी इस्लामिक कट्टरपंथीयांशी संगनमत केले होते. प्रत्यक्षात हल्ला होईपर्यंत मार्गदर्शन केले होते. या भीषण बॉम्बस्फोटाच्या अवघ्या तीन आठवडे आधी, साले यांनी संबंधित ठिकाणाची आणि तिथल्या गर्दीची माहिती गोळा करण्यासाठी काही मुस्लिम व्यक्तींची भेट घेतली होती," असेही मंत्र्यांनी स्पष्ट केले.

विजेपाला यांनी माहिती दिली की, दहशतवाद प्रतिबंधक कायद्यांतर्गत (PTA) कोठडीत असलेल्या साले यांनी अन्नत्याग आंदोलन (उपोषण) सुरू केले होते. त्यानंतर प्रकृती खालावल्याने रविवारी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, विरोधी पक्षाचे कार्यकर्ते त्यांच्या सुटकेची मागणी करत राजधानीत निदर्शने करत आहेत. साले यांच्या चौकशीनंतर, तपास अधिकाऱ्यांनी माजी राष्ट्राध्यक्ष गोटाबाया राजपक्षे यांना देश सोडण्यास बंदी घालणारे न्यायालयाचे आदेश मिळवले आहेत.

२०१९ मध्ये राजपक्षे राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर लगेचच साले यांची देशाची मुख्य गुप्तहेर संस्था 'स्टेट इंटेलिजन्स सर्व्हिस' (SIS) च्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली होती. 'एसआयएस'चे प्रमुख होण्यापूर्वी त्यांनी लष्करी गुप्तहेर विभागाचेही नेतृत्व केले होते.

ब्रिटिश वृत्तवाहिनी 'चॅनल ४' ने २०२३ मध्ये एका रिपोर्टमध्ये दावा केला होता की, सुरेश साले यांचे आत्मघाती बॉम्बस्फोट घडवून आणणाऱ्या इस्लामिक कट्टरपंथीयांशी संबंध होते आणि हल्ल्यापूर्वी त्यांनी त्यांची भेटही घेतली होती.

# आई झाल्यानंतर कतरिना कैफच्या कमबॅकची तयारी



बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ गेल्या काही काळापासून चित्रपटांपासून दूर आहे. आई झाल्यानंतर तिने आपल्या कुटुंबाला आणि मुलाच्या संगोपनाला प्राधान्य दिले होते. मात्र आता कतरिना पुन्हा एकदा अभिनय क्षेत्रात पुनरागमन करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा रंगली आहे. तिचे चाहतेही तिच्या कमबॅकची आतुरतेने वाट पाहत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कतरिना सध्या विविध चित्रपट आणि प्रोजेक्ट्सच्या स्क्रिप्ट वाचत आहे. मात्र ती कोणताही प्रोजेक्ट घाईघाईने स्वीकारण्याच्या मनःस्थितीत नाही. आपल्या आयुष्यातील नव्या टप्प्याशी सुसंगत अशी कथा आणि भूमिका निवडण्यावर तिचा भर असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे प्रत्येक स्क्रिप्टचा ती बारकाईने अभ्यास करत आहे. विशेष म्हणजे कतरिना आता OTT प्लॅटफॉर्मवरही काम करण्याचा विचार करत असल्याची माहिती समोर आली आहे. जर हा निर्णय प्रत्यक्षात आला, तर तिच्या कारकिर्दीतील हा पहिलाच OTT प्रोजेक्ट ठरेल. सध्या अनेक मोठे बॉलिवूड कलाकार डिजिटल माध्यमांकडे वळताना दिसत आहेत. त्यामुळे कतरिनाही या नव्या माध्यमाचा अनुभव घेण्यास उत्सुक असल्याचे म्हटले जात आहे. रिपोर्टनुसार, कतरिना २०२७ च्या उत्तरार्धात पुन्हा शूटिंगला सुरुवात करू शकते. त्यामुळे तिच्या नव्या प्रोजेक्टबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. ती मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणार की OTT वरून नवी सुरुवात करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कतरिना शेवटची २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'Merry Christmas' या चित्रपटात दिसली होती. या चित्रपटात तिच्यासोबत विजय सेतुपती प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला होता. दोघांच्या अभिनयाचे आणि पडद्यावरील केमिस्ट्रीचेही भरभरून कौतुक झाले होते. याआधी ती 'Tiger 3' या चित्रपटात झळकली होती. कतरिनाच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाल्यास, तिने डिसेंबर २०२१ मध्ये अभिनेता विकी कौशल याच्यासोबत विवाह केला होता. राजस्थानमध्ये पारंपरिक पद्धतीने झालेल्या या लग्नाला कुटुंबीय आणि जवळचे मित्र उपस्थित होते. त्यानंतर ७ नोव्हेंबर २०२५ रोजी कतरिना आणि विकी यांच्या घरी मुलाचा जन्म झाला. या मुलाचे नाव विहान कौशल असे ठेवण्यात आले आहे. सध्या तरी कतरिनाच्या पुनरागमनाबाबत अधिकृत घोषणा झालेली नसली, तरी ती पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज होत असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे आगामी काळात तिच्या चाहत्यांना मोठी आनंदाची बातमी मिळण्याची शक्यता आहे.

# मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात जॅकलिन सर्वोच्च न्यायालयात

बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. २०० कोटी रुपयांच्या कथित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात तिने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. दिल्लीतील ट्रायल कोर्टाने तिच्याविरोधात आरोप निश्चित करण्याचा दिलेला आदेश रद्द करण्यात यावा, अशी मागणी जॅकलिनने केली आहे. या प्रकरणाची सुनावणी आता ११ जून रोजी होणार असून त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जॅकलिन फर्नांडिसने थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ट्रायल कोर्टाने दिलेल्या आदेशात अनेक कायदेशीर त्रुटी असल्याचा दावा तिने केला आहे. उपलब्ध पुरावे आणि परिस्थिती लक्षात घेतल्यास तिच्याविरोधात आरोप निश्चित करणे योग्य नसल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे. तसेच प्रकरणाची निष्पक्षपणे पुन्हा तपासणी करण्यात यावी, अशी मागणीही अभिनेत्रीने केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची तातडीने सुनावणी घेण्यास सहमती दर्शवली असून ११ जून ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि ए.एस. चांदूरकर यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होणार आहे.



# लग्नाच्या वाढदिवसानिमित्त नयनताराची पती विग्नेश आणि जुळ्या मुलांसोबत खास पोस्ट

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील स्टार अभिनेत्री नयनतारा आणि दिग्दर्शक विग्नेश शिवन यांच्या लग्नाला चार वर्षे पूर्ण झाली आहेत. या खास दिनाच्या निमित्ताने नयनताराने सोशल मीडियावर पती आणि जुळ्या मुलांसोबतचे काही सुंदर कौटुंबिक फोटो शेअर करत चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. सध्या नयनतारा आपल्या कुटुंबासह व्हॅटिकन सिटीमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेत आहे. याच ट्रिपमधील काही खास क्षण तिने इन्स्टाग्रामवर चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये नयनतारा, विग्नेश आणि त्यांची जुळी मुले एकत्र आनंदी क्षण साजरे करताना दिसत आहेत. काही फोटोंमध्ये नयनतारा आपल्या मुलांवर आणि पतीवर प्रेमाचा वर्षाव करताना दिसते, तर काही फोटोंमध्ये संपूर्ण कुटुंब व्हॅटिकन सिटीच्या रस्त्यांवर फिरताना दिसत आहे. एका फोटोत नयनतारा आणि विग्नेश रोमँटिक पोज देताना दिसतात, तर दुसऱ्या फोटोमध्ये दोघेही एकमेकांकडे पाहून हसताना दिसत आहेत. हे फोटो पोस्ट करत नयनताराने "Happy Anniversary to Us" असे कॅप्शन दिले आहे. तिच्या या पोस्टवर चाहत्यांसह अनेक सेलिब्रिटींनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. अभिनेत्री सामंथा रुथ प्रभूने "Happy Happy" अशी प्रतिक्रिया दिली, तर अदिती राव हैदरीने "Happy Happiest" असे म्हणत या जोडप्याला शुभेच्छा दिल्या.



# मेस्सी है तो मुमकिन है..!

## फिफा फुटबॉल वर्ल्ड कप २०२६: ३९ वर्षीय लिओनेल मेस्सीचा मैदानात उतरताच गोल!

**महाईन्यूज । अर्जेंटिना**

**फिफा फुटबॉल वर्ल्ड कप २०२६ च्या सुरुवातीपूर्वी आपल्या शेवटच्या सराव (वॉर्म-अप) सामन्यात अर्जेंटिनाने आइसलँडचा ३-० अशा फरकाने पराभव केला. दुखापतीतून पुनरागमन करणाऱ्या लिओनेल मेस्सीने या सामन्यात मैदानात उतरताच अवघ्या काही सेकंदांत गोल डागला. त्याने संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली, तसेच या वर्ल्ड कपपूर्वी आपल्या फिटनेसबाबत ( Messi Fitness Update) असलेल्या सर्व शंका दूर केल्या आहेत.**



### दुखापतीतून सावरल्यानंतरचा मेस्सीचा पहिलाच गोल

सामन्याच्या ७०व्या मिनिटाला जेव्हा लिओनेल मेस्सी मैदानात उतरला, तेव्हा प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. या ३९ वर्षीय खेळाडूने लगेचच खेळावर आपला प्रभाव पाडला आणि आपल्या अचूक पासेसच्या जोरावर आइसलँडचा बचाव भेदण्यास मदत केली. मेस्सीने मैदानात येताच पेनाल्टी घेतली आणि गोल डागला. अर्जेंटिनासाठीचा हा त्याचा ११७वा गोल होता आणि दुखापतीतून परतल्यानंतरचा हा त्याचा पहिलाच गोल ठरला. मेस्सीने संघाची आघाडी २-० अशी केली आणि त्यानंतर तिसऱ्या गोलमध्येही महत्त्वाची भूमिका बजावली.

अर्जेंटिना सध्याचा डिफेंडिंग चॅम्पियन (विजेता) संघ आहे. आइसलँडविरुद्धच्या सामन्यापूर्वी संघाचे प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी यांनी 'प्लेइंग इलेव्हन'मध्ये काही प्रयोग केले होते. याच कारणामुळे मेस्सीसह अनेक दिग्गज खेळाडूंना सुरुवातीला बेंचवर (राखीव खेळाडू म्हणून) ठेवण्यात आले होते. मेस्सी हा २४ मे रोजी एका क्लब सामन्यानंतर स्नायूंच्या थकव्यामुळे आणि हॅमस्ट्रिंगच्या किरकोळ दुखापतीमुळे एकही सामना खेळला नव्हता. त्यामुळे आगामी स्पर्धेतील त्याच्या तयारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते.

सराव सामन्याच्या सुरुवातीच्या मिनिटांत आइसलँडच्या मिकेल एगिल एलर्टसनने गोल करण्याची एक सुवर्णसंधी गमावली. आइसलँडच्या पेनाल्टी एरियामध्ये झालेल्या गोंधळाचा फायदा घेत डिफेंडर व्हॅलेंटिन बार्कोने गोल करून अर्जेंटिनाला आघाडी मिळवून दिली. बॉलवर जास्त वेळ ताबा असूनही अर्जेंटिनाला




हाफ-टाइमपूर्वी आपली आघाडी वाढवता आली नाही. या दरम्यान निको पाजने एक चांगली संधी गमावली, तर आइसलँडचा गोलकीपर एलियास ओलाफसनने एक महत्त्वाचा बचाव करून आपल्या संघाला सामन्यात टिकवून ठेवले.

हाफ-टाइमच्या ब्रेकनंतर प्रशिक्षक स्कालोनी यांनी एन्झो फर्नांडिस, अलेक्सिस मॅक अलिस्टर आणि लाऊतारो मार्टिनेझ अशा महत्त्वाच्या खेळाडूंना मैदानात उतरवले. लाऊतारो दोनदा गोल करण्याच्या जवळ पोहोचला होता; पण दोन्ही वेळा बॉल गोलपोस्टला धडकला.

याचदरम्यान दुसऱ्या हाफमध्ये अर्जेंटिनाने आक्रमक खेळ कायम ठेवत आइसलँडच्या बचावफळीवर सातत्याने दबाव निर्माण केला. मेस्सी मैदानात आल्यानंतर संघाच्या आक्रमणाला अधिक धार आली आणि त्याच्या अचूक पासिंगमुळे अनेक धोकादायक संधी निर्माण झाल्या.

---

## पदार्पणातच धमाका! मानव सुथारला इंग्लंडमधून काउंटी क्लबची ऑफर

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा फिरकीपटू मानव सुथार आता काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळताना दिसणार आहे. त्याने इंग्लंडचा प्रसिद्ध काउंटी क्लब 'वॉरिकशायर'सोबत काउंटी चॅम्पियनशिपच्या पुढील दोन सामन्यांसाठी (राउंड) अल्पकालीन करार (Short term deal) केला आहे. क्लबने बुधवारी यासंदर्भात अधिकृत घोषणा केली.**



### पदार्पणाचा क्षण अत्यंत अभिमानाचा

"मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर सर आणि कर्णधार शुभमन गिल यांनी मला सांगितले की मी या सामन्यात पदार्पण करणार आहे. तो माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण होता. कारण मी क्रिकेट खेळायला लागल्यापासून हे माझे, माझ्या वडिलांचे आणि आम्हा सर्वांचे स्वप्न होते की मी भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळावे." या वर्षी आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सकडून खेळणाऱ्या सुथारने सांगितले की, त्याला कसोटी क्रिकेट खेळण्याच्या संधीसाठी स्वतःला तयार ठेवायचे होते, म्हणूनच तो आयपीएल दरम्यानही लाल चेंडूने सराव करत होता.

२३ वर्षांच्या सुथारने आपल्या पदार्पणाच्याच कसोटी सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत एकूण ७ विकेट्स घेतल्या. यात पहिल्या डावात अवघ्या ३३ धावा देत ६ बळी घेण्याच्या कामगिरीचाही समावेश आहे. त्याच्या या घातक गोलंदाजीच्या जोरावर भारताने अफगाणिस्तानचा एक डाव आणि ३०० धावांनी पराभव करत कसोटी इतिहासातील आपला सर्वात मोठा विजय नोंदवला.

पहिल्याच सामन्यातील या दमदार कामगिरीमुळे मानव सुथारला ही मोठी संधी मिळाली आहे. वॉरिकशायरच्या यॉर्कशायर आणि सोमरसेटविरुद्ध होणाऱ्या सामन्यांसाठी तो उपलब्ध असेल. भारतासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण करण्यापूर्वी त्याने २९ प्रथम श्रेणी (First Class) सामन्यांमध्ये १२९ विकेट्स घेतल्या आहेत. सुथारच्या येण्याने आमच्या गोलंदाजीला अधिक धार येईल, असा विश्वास वॉरिकशायर क्लबने व्यक्त केला आहे. तर, "या हंगामाची (सीझन) शानदार सुरुवात करणाऱ्या संघासोबत जोडला गेल्याने मी अत्यंत उत्सुक आहे," अशी प्रतिक्रिया सुथारने प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.

कसोटी सामन्यानंतर 'जिओ हॉटस्टार'शी बोलताना सुथार म्हणाला होता की, "मी ज्या दिवसापासून क्रिकेट खेळायला सुरुवात केली, तेव्हापासून कसोटी क्रिकेट हेच माझ्यासाठी सर्वस्व राहिले आहे. हा या खेळाचा सर्वोच्च स्तर आहे. त्यामुळे मी अंडर-१९ क्रिकेट खेळत असो वा रणजी ट्रॉफी, भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळणे हेच माझे नेहमीच ध्येय होते. पदार्पणाच्या वेळी कॅप देताना कुलदीप (यादव) भाईंनी सांगितलेले शब्द खूप प्रेरणादायी होते. सर्वांनीच माझा उत्साह वाढवला, त्यामुळे हा क्षण माझ्यासाठी खरोखरच खूप खास होता."

"जेव्हा संघात माझे नाव आले, तेव्हा आयपीएल सुरू असतानाही मी लाल चेंडूने सराव करत होतो आणि विचार करत होतो की संधी मिळाली तर मी कशी कामगिरी करेन," असेही सुथारने म्हटलं होतं. या ऐतिहासिक कामगिरीमुळे मानव सुथारचे नाव भारतीय क्रिकेटमधील उदयोन्मुख स्टार म्हणून वेगाने चर्चेत आले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। गुरुवार ।
दि. 11 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# टोईंग कारवाईसाठी नवे कडक नियम लागू

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

टोईंग कारवाईदरम्यान कर्मचाऱ्यांकडून होणारे गैरवर्तन, अरेरावीची भाषा तसेच गणवेश व ओळखपत्राविना सुरू असलेल्या कामकाजाच्या तक्रारींची गंभीर दखल घेत पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाने नवे कडक नियम लागू केले आहेत. नव्याने पदभार स्वीकारलेल्या वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त विक्रांत देशमुख यांनी टोईंग कारवाई अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि जबाबदार पद्धतीने करण्यासाठी स्पष्ट निर्देश जारी केले आहेत.

शहरातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी आणि 'नो पार्किंग'मध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी टोईंग व्हॅनचा वापर केला जातो. मात्र, काही कर्मचाऱ्यांकडून वाहनचालकांशी उद्धट वर्तन, अपुरी माहिती देणे, अरेरावीची भाषा वापरणे तसेच गणवेश आणि ओळखपत्राशिवाय कामकाज केल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने ही कारवाई केली आहे.

नव्या आदेशानुसार, टोईंग कारवाई करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना अधिकृत गणवेश परिधान करणे आणि ओळखपत्र गळ्यात लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारवाईत सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच, टोईंग करणाऱ्या वाहनांवर आवश्यक परवाने, वैध कागदपत्रे आणि अधिकृत माहिती स्पष्टपणे प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आवश्यक माहिती नसलेल्या वाहनांकडून टोईंग कारवाई केली जाणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, टोईंग कारवाईपूर्वी सर्व नियमांचे पालन होत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी वाहतूक शाखेतील प्रभारी अधिकारी आणि अंमलदारांवर सोपविण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरले जाईल, असा स्पष्ट इशारा वाहतूक विभागाने दिला आहे.


### टोईंग कारवाईतील नवे नियम

टोईंग कर्मचाऱ्यांना गणवेश व ओळखपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. टोईंग वाहनांवर आवश्यक परवाने व अधिकृत माहिती प्रदर्शित करावी लागणार आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना काम करण्यास परवानगी दिली जाणार नाही. तसेच नियमभंग झाल्यास संबंधित प्रभारी अधिकारी व अंमलदारांनाही जबाबदार धरले जाणार आहे.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp



CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पिंपरी-चिंचवडमध्ये देशातील पहिले संविधान भवन उभारणीच्या कामाला गती

## आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतील महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भाजपाचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड शहरात साकार होत असलेल्या देशातील पहिल्या संविधान भवनाच्या उभारणीच्या कामाला आणखी गती मिळाली आहे. संविधान भवन व विपश्यना केंद्र (टप्पा क्र. १) प्रकल्पाच्या सिमाभिंतीच्या सुधारित कामासाठी आवश्यक वाढीव खर्चास स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे.**



भाजपाचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड शहरात साकार होत असलेल्या देशातील पहिल्या संविधान भवनाच्या उभारणीच्या कामाला आणखी गती मिळाली आहे. संविधान भवन व विपश्यना केंद्र (टप्पा क्र. १) प्रकल्पाच्या सिमाभिंतीच्या सुधारित कामासाठी आवश्यक वाढीव खर्चास स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या “क” प्रादेशिक कार्यालयांतर्गत विशेष योजना लेखाशिर्षाकाखाली संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्याच्या कामास प्रशासक ठराव क्र. ६५१, दिनांक ३० जुलै २०२४ अन्वये २०० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सिमाभिंतीच्या कामासाठी २ कोटी ५२ लाख ४८ हजार ४७७ रुपयांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. पुढे स्थायी समिती ठराव क्र. ४३२७, दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ नुसार २ कोटी १० लाख ७ हजार ९१७ रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली होती.

मात्र, संविधान भवनासाठी ताब्यात आलेल्या भूखंडाचा परिसर अत्यंत उंच-सखल असून काही भागात दलदल व काळ्या मातीचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मूळ अंदाजपत्रकात प्रस्तावित असलेल्या ३ मीटर अंतरावरील कॉलम फुटिंग पद्धतीने सिमाभिंत उभारणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याचे स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर जमिनीच्या पातळीपर्यंत मजबूत रिटेनिंग वॉल आणि त्यावर आरसीसी परदी उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.



“भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला समानता, न्याय आणि बंधुतेची दिशा दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन उभारण्यात येणारे संविधान भवन हे सामाजिक जागृती आणि बौद्धिक विकासाचे केंद्र बनेल. विशेषतः विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि तरुण पिढीला संविधानाचा सखोल अभ्यास करण्यासाठी येथे जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होतील. हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक आणि सामाजिक विकासात मोलाची भर घालणारा ठरेल.”

**- सारिका गायकवाड, सदस्या, स्थायी समिती.**



“पिंपरी-चिंचवड शहराला देशातील पहिले संविधान भवन लाभत असल्याचा आम्हाला अभिमान आहे. संविधान भवनासोबत उभारण्यात येणारी आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी ज्ञान, संशोधन आणि वैचारिक प्रबोधनाचे प्रभावी व्यासपीठ निर्माण करेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी आणि प्रगतिशील विचारांचा वारसा जपणारा हा प्रकल्प शहराच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक ओळखीला नवे परिमाण देणारा ठरेल. आगामी काळात हे केंद्र राष्ट्रीय स्तरावरील आकर्षणाचे ठिकाण बनेल, असा आम्हाला विश्वास आहे.”

**- डॉ. सुहास कांबळे, सदस्य, शहर सुधारणा समिती.**

या बदलामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ होणार असून सुधारित खर्चासाठी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक होती. त्यानुसार सिमाभिंतीच्या कामासाठी ३ कोटी ९० लाख २८ हजार ३४० रुपयांचा वाढीव खर्च प्रस्तावित करण्यात आला. परिणामी मटेरियल टेस्टिंग, रॉयल्टी, एक टक्का लेबर इन्शुरन्स, जीएसटी (१८ टक्के) तसेच भाववाढ यांसह एकूण खर्च ७ कोटी ४५ लाख ६ हजार ३५० रुपये इतका होणार आहे.

स्थायी समितीने या सुधारित खर्चास मान्यता दिल्यामुळे संविधान भवनाच्या उभारणीसाठी आवश्यक पायाभूत कामांना वेग मिळणार आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून साकार होणारे हे संविधान भवन नागरिकांमध्ये भारतीय राज्यघटनेविषयी जागरूकता निर्माण करणारे तसेच अभ्यास, संशोधन आणि सामाजिक प्रबोधनाचे महत्त्वपूर्ण केंद्र ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



“भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय संविधानाच्या मूल्यांचा प्रसार आणि जतन करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवडमध्ये आदर्श संविधान भवन उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी, अभ्यासिका आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. संविधान भवन हे केवळ एक वास्तू नसून, भावी पिढ्यांसाठी संविधानाच्या विचारांचा प्रेरणादायी केंद्रबिंदू ठरेल. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आवश्यक सर्व प्रशासकीय आणि आर्थिक पाठबळ देण्यास स्थायी समिती कटिबद्ध आहे.”

**- अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती.**

---

# रावेत मस्के वस्ती मैदानावरील राडा-रोडा हटविण्यास सुरुवात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मस्के वस्ती परिसरातील मैदानावर मोठ्या प्रमाणात साचलेल्या बांधकाम कचरा आणि राडारोड्यामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची व्यथा प्रभातने पर्यावरण विभागासमोर सातत्याने मांडली.**

या पाठपुराव्याची दखल घेत प्रशासनाने मैदानावरील राडारोडा व बांधकाम वेस्ट हटविण्याची प्रक्रिया सुरू केली असून स्थानिक नागरिकांनी या प्रकरणी समाधान व्यक्त केले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून मैदानावर टाकण्यात आलेल्या बांधकाम वेस्टमुळे परिसरात धुळीचे प्रमाण वाढले होते. यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रहिवाशांना श्वसनाच्या समस्या जाणवत होत्या. तसेच राडारोड्याच्या ढिगाऱ्यांमध्ये साप, घूस यांसारख्या सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मैदानाचे सौंदर्यही बाधित होत असल्याने नागरिकांकडून सातत्याने मैदान मोकळे करण्याची मागणी केली जात होती. या समस्येबाबत प्रभातने नागरिकांच्या भावना आणि अडचणींना वाचा फोडत पर्यावरण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. विभागाने नागरिकांचे समस्या जाणून घेत आवश्यक कार्यवाही सुरू करत मैदानावरील राडारोडा हटविण्याचे काम हाती घेतले आहे.



सध्या मैदान स्वच्छ करण्याचे काम सुरू असून भविष्यात या ठिकाणी पुन्हा बांधकाम वेस्ट टाकला जाणार नाही, यासाठी देखील उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी प्रशासन तसेच त्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडणाऱ्या प्रभातचे आभार व्यक्त केले आहेत.

नागरिकांच्या आरोग्याशी आणि सुरक्षिततेशी संबंधित हा प्रश्न मार्गी लागल्याने मस्के वस्ती परिसरात समाधानाचे वातावरण असून मैदान लवकरच स्वच्छ आणि सुशोभित स्वरूपात नागरिकांसाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# 'पिंपरी-चिंचवड' दर्शन अवघ्या ५०० रुपयांत?

## आमदार शंकर जगताप यांच्या सूचनेला यश: ऐतिहासिक, धार्मिक आणि विज्ञानाचा अनुभव

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनातून प्रेरणा घेत आणि स्थानिक पर्यटनाला वाव देण्याच्या उद्देशाने आमदार शंकर जगताप यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाला (पीएमपी) पुणे दर्शनच्या धर्तीवर 'पुणे व पिंपरी-चिंचवड दर्शन' (बससेवा क्र. २) ही विशेष पर्यटन सेवा सुरू करण्याच्या सूचना केल्या होत्या.**




त्यानुसार प्रवाशांच्या सेवेसाठी ही बससेवा दाखल होणार आहे. यामुळे आता पर्यटकांना अवघ्या ५०० रुपयांत शहरांतील समृद्ध वारसा, संस्कृती आणि पर्यटन वैभव जवळून अनुभवता येणार आहे.

आमदार शंकर जगताप यांनी २७ मे २०२६ रोजी पीएमपीएल प्रशासनासोबत या संदर्भात विशेष बैठक घेतली होती. सार्वजनिक बससेवेच्या माध्यमातून शहरातील पर्यटनाला चालना मिळावी, अशी सूचना त्यांनी केली होती. या सूचनेची दखल घेत पीएमपी प्रशासनाने तातडीने या सेवा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. ही सहल धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक अशा सर्व पैलूंचा संगम आहे. या एका दिवसाच्या सहलीत सर्व वयोगटातील पर्यटकांना विज्ञान, इतिहास आणि निसर्गाचा अनुभव घेता येईल. या सहलीचे बुकिंग करण्यासाठी ऑनलाइन बुकिंग देखील सुरू करण्यात येणार आहे.

चिंचवडचे महासाधू श्रीमन मोरया गोसावी मंदिर, मंगलमूर्ती वाडा, क्रांतिकारक चापेकर बंधू स्मारक/वाडा, सायन्स पार्क, रावेतचे इस्कॉन मंदिर यांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे शहराची ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक ओळख अधिक व्यापक स्तरावर पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.



"पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्याचे जे आवाहन केले आहे, त्यातून प्रेरणा घेऊन आम्ही हा उपक्रम हाती घेतला. पिंपरी-चिंचवड या शहराला मोठा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा लाभला आहे. हा समृद्ध वारसा नागरिकांना, विशेषतः तरुण पिढीला आणि पर्यटकांना एकाच प्रवासात अनुभवता यावा, हा यामागील मुख्य उद्देश होता. अवघ्या ५०० रुपयांत 'पिंपरी दर्शन' ही विशेष बससेवा सुरू झाल्यामुळे सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात पर्यटन करता येईल. पीएमपी प्रशासनाने आमच्या सूचनेची तातडीने दखल घेतली. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. या सुविधेमुळे शहरातील पर्यटनाला निश्चितच एक नवी चालना मिळेल आणि नागरिक याचा मोठ्या संख्येने लाभ घेतील, असा मला विश्वास आहे."

**- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

PMPML
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
परिवहन सेवा
पुणे-पिंपरी-चिंचवड महानगर

---

## तळेगाव येथील एमआयडीसीतील एका कंपनीत गॅस गळती; २ कामगारांचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**तळेगाव एमआयडीसीतील एका कंपनीत अग्निशमन यंत्रणेच्या देखभाल कामादरम्यान कार्बन डायऑक्साइड (CO2) गॅसची गळती होऊन झालेल्या दुर्घटनेत दोघांचा मृत्यू झाला. तर, एकावर उपचार सुरू आहेत. ही घटना मंगळवारी (दि.९) दुपारी साडेबाराच्या सुमारास तळेगाव एमआयडीसी फेज-१ येथील शाफलर इंडिया कंपनीत घडली.**



गौरीशंकर शर्मा आणि वैभव थोरात अशी मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तर, प्रमोद जैस्वार यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. दुर्घटनेच्या वेळी शाफलर कंपनीचे कर्मचारी कृष्णा साहू आणि सुशोभन पाखीरा हे देखील घटनास्थळी उपस्थित होते. त्यांनाही किरकोळ स्वरूपाचा त्रास झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव एमआयडीसी येथील शाफलर इंडिया कंपनीतील अग्निशमन सिलिंडरच्या देखभाल आणि तपासणीचे काम उषा फायर सर्व्हिसेसच्या कर्मचाऱ्यांकडून सुरू होते. यावेळी गौरीशंकर शर्मा, वैभव थोरात, प्रमोद जैस्वार, कृष्णा साहू आणि सुशोभन पाखीरा हे काम करत होते. दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अग्निशमन सिलिंडरमधून अचानक CO2 गॅसची गळती सुरू झाली. गॅसचा प्रादुर्भाव वाढल्याने तीन कर्मचारी बेशुद्ध पडले.

घटनेची माहिती मिळताच सहकाऱ्यांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले. बेशुद्ध झालेल्या कर्मचाऱ्यांना उपचारासाठी पवना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गौरीशंकर शर्मा आणि वैभव थोरात यांना तपासून मृत घोषित केले. प्रमोद जैस्वार यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले.

या घटनेनंतर कंपनी परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. दुर्घटनेची माहिती मिळताच तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून CO2 गॅसची गळती नेमकी कशामुळे झाली, सुरक्षा उपाययोजनांमध्ये काही त्रुटी होत्या का, तसेच देखभाल प्रक्रियेदरम्यान आवश्यक नियमांचे पालन करण्यात आले होते का, याचा सखोल तपास पोलिसांकडून सुरू आहे. या दुर्घटनेमुळे औद्योगिक सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही पुढे येत आहे. या दुर्घटनेमुळे औद्योगिक क्षेत्रात कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, गॅस गळतीमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दुर्घटनेनंतर कंपनीतील संबंधित विभागातील कामकाज तात्पुरते थांबविण्यात आल्याची माहिती मिळाली. घटनास्थळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी तत्काळ आपत्कालीन यंत्रणेला माहिती देत बचावकार्य सुरू केले.

### परिसरात हळहळ व्यक्त

अग्निशमन यंत्रणेच्या देखभाल आणि तपासणीदरम्यान सुरक्षा नियमांचे पालन झाले होते का, याचीही चौकशी केली जात आहे. पोलिसांसह संबंधित शासकीय विभागाकडूनही या दुर्घटनेचा स्वतंत्र अहवाल तयार करण्यात येत आहे. मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. कंपनी प्रशासनाकडून या प्रकरणात आवश्यक ती सर्व मदत आणि सहकार्य करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. तपासाचा अहवाल समोर आल्यानंतर दुर्घटनेचे नेमके कारण आणि जबाबदारी निश्चित होणार आहे.

# भारतासाठी एआय ही एक अमूल्य संधी

## हॉटेल ऑर्चिड येथे पीबीएस, पीसीयु चे "एचआर एक्सलन्स अवॉर्ड २०२६" संपन्न

**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**भारतासाठी एआय ही एक अमूल्य संधी आहे. भारताकडे मोठी स्पर्धात्मक आणि मानवी भविष्य सुरक्षित करण्याची क्षमता आहे. त्याचा एचआर अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय साधून उपयोग करावा, यश आपलेच आहे असा आत्मविश्वास अदानी पावर लि. कंपनीचे मुख्य मनुष्यबळ विकास अधिकारी अमिताभ मिश्रा यांनी व्यक्त केला.**



पुणे, बालेवाडी येथील हॉटेल ऑर्चिड येथे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे बिझनेस स्कूल, एचआर सक्सेस टॉक, आयस्किल बॉक्स आणि कोबज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या “एचआर एक्सलन्स अवॉर्ड २०२६” चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मिश्रा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर जेष्ठ उद्योगपती पद्मश्री प्रतापराव पवार, भारत फोर्स कंपनीच्या एच. आर. उपाध्यक्ष डॉ. लीना देशपांडे, पिंपरी चिंचवडचे माजी पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश, उद्योजक नरेंद्र लांडगे, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, एमइडीसी चे उपाध्यक्ष सचिन इटकर, पीसीईटी प्लेसमेंट डीन डॉ. शीतलकुमार रवंदळे, पीबीएस संचालक डॉ. गणेश राव, पीबीएस डीन डॉ. मीनाक्षी त्यागी, इंडस्ट्री इंटरॅक्शन सेल संचालक डॉ. प्रणव चरखा आणि परीक्षक, विविध गटातील पुरस्कार प्राप्त एचआर विविध कंपन्यांमधील प्रतिनिधी उपस्थित होते.

विकसित देशासाठी आवश्यक असणाऱ्या भावी पायाभूत सुविधा आता आपल्याकडे आहेत. सरकार देखील सकारात्मक आहे मला पूर्ण आत्मविश्वास आहे की, आजची युवा पिढी विकसित भारतासाठी मुख्य योगदान देईल. आपल्याकडे उद्योगांचे मूल्यांकन करायची करण्याची क्षमता आणि योजना आहे. चैतन्यशील स्टार्ट अप्स परिसंस्था आणि जागतिक दर्जाची डिजिटल पायाभूत सुविधा, तरुण लोकसंख्या, संगणक, स्थानिक पुरवठा साखळी, संगणकाच्या अनेक प्रणाली, बाजारपेठ हे सर्व भारतात उपलब्ध आहे. एआय या माहितीशिवाय दुसरे काही नाही. तुम्ही ही माहिती कशी उपयोगात आणता हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आता कामाची शिकण्याची आणि नवनिर्मितीची पद्धत बदलत आहे.

> एआय हे निर्णय प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि वेगवान करू शकते, परंतु मानवी संवेदनांची, विवेकाची जागा घेऊ शकत नाही. आपण स्वतःच्या कौशल्य विकासावर आणि मानवी सहयोगावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. मानवी सहभागाशिवाय कोणतेही यंत्र, एआय किंवा डिजिटल प्रणाली काम करू शकत नाही. भविष्य हे एआय ची सांगड मानवी बुद्धिमत्ता, भावनिक बुद्धिमत्ता आणि नैतिक बुद्धिमत्ता यांचा योग्य वापर आणि समन्वय साधनारांचे असेल
>
> - अमिताभ मिश्रा, मुख्य मनुष्यबळ विकास अधिकारी, अदानी पावर लि.

### पुढील २० वर्षे ही ‘शिकण्याची वर्षे’

भारत फोर्स कंपनीच्या उपाध्यक्ष एचआर उपाध्यक्ष डॉ. लीना देशपांडे यांनी सांगितले की, ज्येष्ठ उद्योगपती बाबासाहेब कल्याणी यांनी म्हटल्याप्रमाणे, पुढील २० वर्षे ही ‘शिकण्याची वर्षे’ असतील; त्यामुळे पीसीयू सारख्या विद्यापीठांच्या सहकार्याने कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे आणि त्यांना भविष्यातील अर्थव्यवस्थेसाठी व प्रगतीसाठी सज्ज करणे ही एचआरची जबाबदारी आहे. ज्ञान आणि कौशल्ये अद्ययावत ठेवणे विसरू नका; सतत शिकत राहणे हा एक निरंतर प्रवास आहे. एचआर ‘माणसांशी’ संबंधित क्षेत्र आहे आणि लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे असे डॉ. लीना देशपांडे यांनी सांगितले.

## करिअर निवडताना आवड आणि कौशल्य चा विचार करावा – डॉ. शितलकुमार रवंदळे

**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**विद्यार्थ्यांनी आपली आवड आणि कौशल्य काय आहे, याचा विचार करून करिअर निवडावे. तसेच भविष्यात या मधून आपल्याला उत्पन्नासाठी रोजगार आणि व्यवसायाच्या किती संधी आहेत याची माहिती घ्यावी. पालकांनी देखील स्वतःची मतं मुलांवर लादू नयेत असे मार्गदर्शन पीसीईटी प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी केले.**



### ट्रस्टच्या विविध क्षेत्रातील कार्याची माहिती

प्रास्ताविकात खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल रामचंद्र काळभोर यांनी आजपर्यंच्या ट्रस्टच्या विविध क्षेत्रातील कार्याची माहिती दिली. खंडोबा देवस्थान ट्रस्ट मागच्या ३ वर्षांपासून पीसीइटी सोबत मिळून गुणवंतांचा सत्कार करत आहे. या ट्रस्ट ने मेडिकल कॅम्प, मोफत विवाह सोहळा आयोजित केला आहे. तसेच लवकरच स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू करण्यात येणार आहे. ट्रस्ट केवळ धार्मिक कार्य करत नसून सामाजिक कार्यात देखील पुढे आहे.

आकुर्डी मधील खंडोबा देवस्थान ट्रस्ट आणि पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट यांच्या वतीने श्री खंडोबा सांस्कृतिक भवन येथे इयत्ता १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थी, अनाथ आणि मूकबधिर विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे सचिव व श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष व्ही. एस. काळभोर, श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल रामचंद्र काळभोर, उप महापौर शर्मिला बाबर, माजी उप महापौर दिनकरराव दातीर पाटील, कला क्रीडा विभाग सभापती कैलास कुटे, शंकरराव पांढरकर, विजय काळभोर, दगडूशेठ हलवाई ट्रस्टचे विजय कोळपकर, विनायक काळभोर, रोहन मुळे आणि खंडोबा देवस्थान ट्रस्ट सदस्य, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षात दहावी मध्ये वेदांत दाभाडे ९९ टक्के, अद्रिका डागलीया हिने ९७ टक्के आणि १२ वी मध्ये गायत्री कुंभार हिला ९६ टक्के गुण मिळाले आहेत. त्यांना सायकल, स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र, शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले. तसेच इयत्ता १० वी, १२ वी परीक्षेत ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त ३५० विद्यार्थी, पियुष आणि आयुष फुले या दोन अनाथ विद्यार्थ्यांसह, निगडी येथील मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना देखील स्मृतीचिन्हे, प्रमाणपत्र, शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले.

पीसीईटी प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले की, पालकांनी देखील मुलांची आवड त्यांची मते, त्यांचे कौशल्य याचा विचार करून करिअर निवडी साठी मदत करावी. जे क्षेत्र आवडते त्या क्षेत्रातील सीनियर लोकांना भेटणे, चर्चा करणे, त्यांचे मार्गदर्शन घ्यावे यामुळे करिअर निवडायला मदत होईल. क्षेत्र कोणतेही निवडले तरीही त्यामध्ये कायम अपडेट रहा. प्रत्येक सेमीस्टर मध्ये एक प्रोजेक्ट करा. कॉलेज करतानाच ऑफलाइन किंवा ऑनलाईन इंटर्नशिप करावी असेही डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
BLOOD
DONATION
DRIVE
Saturday, 13 June 2026
TIME: 09:30 AM - 12:30 PM
LOCATION: SCHOOL CAMPUS